महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/११४४५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१
**दिनांक: ११.०४.२०२५**

# परिपत्रक

**विषय:** सन २०२५ करिता एम्प्लॉई पोर्टल प्रणालीद्वारे 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' (Long Tenure Option) सादर करणेबाबत.

**संदर्भ:** १. प्रशासकीय परिपत्रक क्र.६७३ दि.२४.०६.२०२४.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५.

****

कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता दरवर्षी सर्वसाधारण बदल्या व विनंती बदल्यांबाबतचे धोरण राबविण्यात येते. दीर्घ सेवा कालावधी निकषांतर्गत होणाऱ्या बदल्यांप्रकरणी कर्मचाऱ्यांच्या तक्रारी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून एकाच परिक्षेत्रात दीर्घकाळ सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी बदलीबाबतचा विनंती पर्याय सादर करण्याकरीता "दीर्घ सेवाकालावधी विकल्प" (Long Tenure Option) या नविन अर्जाची रचना करून "एम्प्लॉई पोर्टल" मध्ये "अर्ज" (Application) या पर्यायाखाली उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र.६७३ दि.२४.०६.२०२४ अन्वये एम्प्लॉई पोर्टल प्रणालीद्वारे 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' सादर करणेबाबतची प्रक्रिया विहित करण्यात आलेली आहे.

२. आता, प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ अन्वये सन २०२५ या व त्यापुढील वर्षाकरिता बदली धोरणाबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे/ सूचना यांचे एकत्रिकरण करण्यात आले असून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदलीकरीता सद्यस्थितीत आवश्यक असलेल्याच तरतूदींचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

३. सदर तरतुदी विचारात घेउन सर्वसाधारण बदली धोरणानुसार दीर्घ सेवाकालावधी निकषांतर्गत जे कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये (Zone of Consideration) येतात, अशा कर्मचाऱ्यांना त्यांनी नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल वर लघुसंदेश/ सूचना पाठविण्यात येईल. संबंधित कर्मचाऱ्यांनी सदरचा लघुसंदेश/ सूचना प्राप्त झाल्यापासून ०५ दिवसांच्या आत आपला 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज एम्प्लॉई पोर्टल प्रणालीव्दारे सादर करणे आवश्यक आहे.

४. जर अशा कर्मचाऱ्यांनी "दीर्घ सेवाकालावधी विकल्प" अंतर्गत आपले पर्याय सादर केले नाही तर त्यांना रिक्त असलेले बदलीचे ठिकाण मान्य आहे असे गृहीत धरून व्यवस्थापनाच्या आवश्यकतेनुसार बदली करण्यात येईल. परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये येणारे अधिकारी व कर्मचारी त्याबाबतचा संदेश एम्प्लॉई पोर्टलमध्ये त्यांच्या वैयक्तीक खात्यामध्ये लॉग इन करून पाहू शकतील.

५. तसेच, ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विनंती बदली अर्जा अंतर्गत विनंती बदलीसाठी किंवा बदलीपासून सूट मिळण्यासाठी विकल्प सादर केला आहे व असे अधिकारी व कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये (Zone of Consideration) आल्यामुळे 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज सादर करण्याकरिता त्यांना लघुसंदेश/ सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी विकल्प किंवा बदलीपासून सूट मिळणेबाबत प्रणालीमार्फत पुन:श्च अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६.	त्याचप्रमाणे सर्व मुख्य अभियंता व सांघिक कार्यालयातील समकक्ष अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, प्रशासकीय बदलीबाबत आपल्या कार्यक्षेत्रात काही प्रस्ताव असल्यास असे सर्व प्रस्ताव दि.१७.०४.२०२५ पर्यंत प्रणालीमार्फत सादर करावेत. तसेच, प्रशासकीय बदलीचे प्रस्ताव सादर करतांना कार्यालयांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही, याबाबतची दक्षता घ्यावी. सबब, नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

७.	सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.